# ऑनलाइन अर्ज भरण्याची कार्य पध्दती

१) प्रस्तुत पदभरतीसाठी केवळ ऑनलाईन पद्धतीने भरण्यात आलेले अर्ज स्वीकारण्यात येतील. ऑफलाईन अर्ज स्विकारले जाणार नाही.

२) सर्व विभागांमध्ये लेखी परीक्षा ही एकाच दिवशी व एकाच वेळेस होणार आहे.

३) उमेदवाराने ज्या विभागासाठी अर्ज केला असेल, त्याच विभागासाठी उमेदवारास पात्रतेच्या अधिन राहून लेखी परिक्षेस बसता येईल व त्याच विभागासाठी गुणवत्तेनुसार निवड केली जाईल.

४) वरील २ व ३ मध्ये जरी नमुद केले असले तरी जर उमेदवाराला एका पेक्षा जास्त विभागामधून अर्ज करावयाचा असल्यास प्रत्येक विभागासाठी स्वतंत्रपणे शुल्क भरावे लागेल व त्यासाठी एकच USER NAME आणि PASSWORD चा वापर करता येईल.

५) एकापेक्षा जास्त विभागांमध्ये अर्ज करणाऱ्या उमेदवाराला अर्ज केलेल्या विभागाचे प्रवेशपत्र उपलब्ध होतील. परंतू उमेदवार ज्या विभागाच्या प्रवेशपत्रावर प्रविष्ठ होईल (परीक्षा देईल) त्याच विभागाचा अर्ज निवडीसाठी ग्राह्य धरण्यात येईल याची उमेदवारानी नोंद घ्यावी.

**६) पात्र उमेदवारांना वेब बेस्ड (web based) ऑनलाईन अर्ज www.mahaagri.gov.in या वेबसाईटव्दारे दि. २९/१२/२०१५ ते दि. १२/०१/२०१६ या कालावधीमध्ये सादर करणे आवश्यक राहील.**

७) अर्ज करू इच्छिणाऱ्या अर्हताधारक उमेदवाराने अर्ज करण्यापुर्वी जाहिरातीतील सर्व माहिती व सुचनांचे बारकाईने वाचन करावे.

८) उमेदवाराने कृषि विभागाच्या www.mahaagri.gov.in या वेबसाईटवर जाऊन कृषि सेवक ऑनलाईन ॲप्लीकेशन या लिंकवर क्लिक करावे.

९) **Online** फॉर्म भरण्यासाठी आधी नवीन नोंदणी ह्या लिंकवर क्लिक करून नवीन **User Name** बनवून रजिस्टर करुन घ्यावा.

१०) **User Name व Password** आपण जो टाकला आहे त्याची प्रिंट काढून घ्यावी किंवा नोंद करून ठेवावी.

११) **User Name व Password** टाकून **Login** बटनावर क्लिक कराव.

१२) ज्या विभागासाठी आपणाला अर्ज करावयाचा आहे त्या विभागासमोरील “अर्ज भरा” या बटनावर क्लिक करावे.

१३) आवेदन पत्रामध्ये पासपोर्ट फोटोची साईज (३.५ से.मी× ४.५ से.मी.) पेक्षा जास्त नसावी व स्वाक्षरीची साईज (३.५ से.मी× १.५ से.मी) पेक्षा जास्त नसावी व ते **JPG** ह्या फॉरमेट मध्ये स्कॅन करून ठेवावी व त्याची साईज **५० KB** पेक्षा जास्त असता कामा नये.

१४) **Upload** फोटो ह्या ठिकाणी **Select File** ह्या बटनावर क्लिक करून फोटो **upload** करावा.

१५) **Upload Singnature** ह्या ठिकाणी **Select File** ह्या बटनावर क्लिक करून **Sign Upload** करावी.

१६) अर्जदाराने संपूर्ण माहिती इंग्रजी लिपीमध्येच सर्व चौकोनात अचूक माहिती भरावी.

१७) ज्या ठिकाणी * असे चिन्ह आहे त्या चौकोनात माहिती भरणे अनिवार्य आहे.

१८) उमेदवाराचे ओळखपत्र प्रकार:- निवडणूक मतदार छाया चित्र ओळखपत्र / आधार कार्ड / पॅन कार्ड / वाहन चालक लायसन्स / राष्ट्रीयकृत बँक पासबुक नुसार खाते क्रमांक / पासपोर्ट क्रमांक यापैकी कोणत्याही एका ओळखपत्राची निवड करून त्याच्या क्रमांकाचा उल्लेख संगणकावर **Online** आवेदन पत्रात नोंदवावा.

१९) उमेदवाराची शैक्षणिक माहिती या मधील Education Detail ह्या बटनावर क्लिक करून आपली शैक्षिणिक अर्हता Add करावी.

२०) शेवटी Form Preview ह्या बटनावर क्लिक करावे. फॉर्म मध्ये आपण भरलेली माहिती अचूक आहे का वाचून खात्री करावी व ज्या ठिकाणी आपणास दुरुस्ती हवी असल्यास खाली दिलेल्या Edit Form या बटनावर क्लिक करून योग्य ती दुरुस्ती करावी व पुन्हा Form Preview या बटनावर क्लिक करावे. जर फॉर्ममध्ये दुरुस्ती नसल्यास Submit Form ह्या बटनावर क्लिक करावे.

२१) उमेदवाराने सर्व माहिती संगणकावरील अर्जात भरल्यानंतर ती Submit Form ह्या बटनावर क्लिक करण्यापूर्वी त्याची तपासून खात्री करावी व नंतरच Submit करावी. अर्ज Submit केल्यानंतर माहितीत बदल करता येणार नाही.

२२) आपणाला “Record Saved Succesfull” असा Message येईल तेव्हाच आपला फॉर्म पूर्ण भरला गेला आहे असे समजावे.

२३) विकलांग व माजी सैनिक उमेदवारांना परीक्षा शुल्क लागू नाही. म्हणून त्यांनी अर्ज पूर्ण भरून झाल्यानंतर अर्जाची प्रिंट काढता येईल.

२४) फॉर्म पुर्ण भरल्यानंतर “चलनप्रत” या बटनावर क्लिक करावे. आपणाला ज्या बँकेची शाखा जवळ आहे. (State Bank of India / State Bank of Hydrabad) त्या बँकेचे चलन प्रिंट करून घ्यावे.

२५) चलन बँकेत भरल्यानंतर पुन्हा User Name व Password ने Login करून पुन्हा Challan Update या बटनावर क्लिक करावे. त्या मध्ये आपणाला बँकेने दिलेला Transaction ID व बँकेत पैसे भरले आहेत त्या बँकेचा Branch Code, Branch Name, बँकेत शुल्क रक्कम भरल्याचा दिनांक, बँकेत भरलेली शुल्क रक्कम व उमेदवाराचा चलनावरील आवेदनपत्र क्रमांक (Form Number) भरुन Submit Challan या बटनावर क्लिक करावे.

२६) त्यानंतर आपणांस आवेदन पत्राची प्रिंट मिळेल.

२७) चलनाची प्रत व आवेदनपत्र उमेदवाराने स्वत:जवळ सांभाळून ठेवावे.

२८) सदर शुल्क हे ना परतावा राहील. कोणत्याही कारणास्तव ते परत केले जाणार नाही.